मच्छिंद्रनाथ माळी

# गांव गप्पा



# गांवगप्पा

मच्छिंद्रनाथ माळी

ई साहित्य प्रतिष्ठान

गांवगप्पा (gaav-gappa) कथा

लेखक : मच्छिंद्रनाथ माळी

शिवकृपा निवास. कोमलनगर, पडेगांव , औरंगाबाद.

Email :-   mali.machhindranath@gmail.com

Ph : 91-9823615747

चित्रे गुगलवरून साभार.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून  पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

G1102, Eternity, Teen Hath Naka, Thane

www.esahity.com

esahity@gmail.com

©esahity Pratishthan® 2014

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

या कथांतील

सर्व पात्रे,

प्रसंग आणि स्थळे

पूर्णतः काल्पनिक आहेत.

कोणाही व्यक्तीशी व प्रत्यक्ष घटनेशी साधर्म्य आढळल्यास


तो योगायोग समजावा.

## कथा-अनुक्रम

पांचाळा

वाटणी

इलाज



## --------० पां चा ळा ०--------

---------------------------------------------------

सुताराच्या जाणकुची पाचवी बाईल अवतरली अन् गावातली तरणीबांड पोरं पुन्हा एकदा बिथरली. तशी ती गावात कोणी नविन सुंदरी आली की यापूर्वीही अनेकदा बिथरली होती. गावात कोणी चटकचांदणी शिरली की यांची डोसकी फिरलीच म्हणून समजा! इतकेच कशाला असा एखादा फटकडी अँटम दिसला म्हणजे नजर अधू झालेले म्हातारबुवाही डोळ्यावर थरथरणारे हात आडवे धरून डोळे ताणुन ताणुन पहात सुटायचे. सारेच ओढाळ जनावरासारखे अनावर व्हायचे. आता तर जाणक्याची नवी बायको म्हणजे सौंदर्याची खाण, यौवनाची सम्राज्ञी त्यात भरभरून आलेली तीची ज्वानी आणखीच भर

टाकत होती. पाहणाऱ्याला ती पहिल्याच नजरेत घायाळ करायची ! सरसा नावासारखीच रुपानं सहस्र नारीत भारी होती. घाटदार बांधा, रेखीव स्मित, हास्य वदन, यौवनात भर घालणारे भरदार वक्ष, पाणीदार मादक नयन अशा तिलोत्तमासह घरात शिरला.

'जाणकूची पाचवी बाईल' असं ऐकल्यावर तुम्हाला नक्कीच नवल वाटेल नाही का ? पण त्याचं काय आहे, लग्नाची पहिली बायको 'सतीसावित्री' होती ती आजाराने गेली. दुसरी 'बदफैली' होती ती जाणक्यानं काढून देण्याऐवजी तीच कुणा एकाचा हात धरून निघुन गेली. मूल होत नाही म्हणून बायकांचे टोमणे असह्य होऊन तिसरीने विहीरीत जलसमाधी घेतली. तिघींचा अनुभव जमेस धरून चौथीने बरेच दिवस जाणकुशी एकनिष्ठ

राहून संसाराचा डोलारा सावरुन धरला पण जाणकू हा पूर्ण ' शिखंडीचा अवतार ' असल्याची तिची खात्री होताच जाणकू जे अपत्य सुख तिच्या पदरी टाकू शकत नव्हता ते ती गावातील तरण्याबांड मंडळीकडून मिळवण्याची धडपड करु लागली. पण काकदृष्टी जाणक्याच्या ध्यानात यायला वेळ लागला नाही. करळ औताला पाचर मारुन सरळ करावं तसा तिला वळणावर आणण्याचा प्रयत्न त्याने केला पण अपत्य सुखाला आसुसलेली ती बाई ताळतंत्र सोडून बेताल होत गेली. जाणक्यानं एकदोनदा लाकडासारखी तासली अन् शेवटी नासली म्हणून सोडून दिली अन् अशा रितीने तो "पांचाळा " बनला होता.

काही काळ शांत झालेले आवर्त पुन्हा एकदा भिरभिरायला लागलं.

'वासनांचा शांत झालेला डोह ' पुन्हा एकदा डहुळला गेला अन् डहुळलेल्या पाण्यावर तरंग उठून जसा तळ दिसेनासा व्हावा तसा जाणकुच्या चार बायकांचा गावाला हा--हा म्हणता विसर पडला. उत्साही रसिक वर्ग पुन्हा नव्या जोमाने जाणकुच्या नव्या बायकोच्या स्वागताला उत्सुक बनला होता. त्याचा तिरस्कार करणारे पुन्हा त्याची जवळीक करु लागले. बरेचजण तर दिवस दिवस सुतार ओट्यावर ठाण मांडू लागले. जो तो काही ना काही काम काढून त्याच्याकडे चकरा मारु लागला. जो तो चकोराने चंद्रकिरणाचे रसपान करावे तसं ते सरसाच्या सौंदर्याचं अधाशासारखे नेत्रसुख घेऊ लागला. जो तो वखवखल्या नजरेने तिच्याकडे पहात होता. नयनबाण मारुन काहींच्या नजरा अधू झाल्या तर काहींचे हात हातवारे करुन गळून गेले होते. चकरा मारुन मारुन काहींचे पाय थकले होते. तालीम करणारे पहिलवान झुरणी लागुन त्यांनी तालीम सोडून सनकाडीसारखे वाळू लागले पण त्यांना सरसाच्या यौवनपुष्पाचा आस्वाद घेण्याचे भाग्य लाभले नाही. बहुतेक प्रणयवीरांची

घोडी थकल्याने त्यांना सरसाच्या ' तारुण्याचा बालेकिल्ला ' सर करण्याची मोहीम अधुरीच सोडावी लागली.

कामाच्या व्यापातुन जाणकूला उसंत मिळेना झाली. नवी लक्ष्मी भाग्य घेऊन आली असं जाणकूला वाटलं. वर्षे कधी उलटून गेलं हे त्याला अन् सरसालाही कळलंच नाही. पण जाणकु षंढ असल्याचे मात्र सरसाच्या लक्षात आलं होतं. पण तिला काहीच कळलं नसल्याचे भासवुन ती जाणकुशी अतिशय प्रेमाने वागत होती. रुपानं देखणी सरसा फार बुद्धिमान होती. आपल्या दुर्बळपणाची तिला जाणीव नाही अशा भ्रांतीत तो होता. तिनं त्याला जराही थांगपत्ता लागु दिला नव्हता. तोच आपला खरा आधार आहे हे तिने अचूक जाणलं होतं. जमिनीवर रेंगाळणाऱ्या दुर्बल लत्तिकेनं वृक्षाचा आधार घेतला तर आकाशात उंच झेपावण्याचं सुख समाधान सहज पदरी पडतं हे तिला चांगलंच ठाऊक होतं. बुद्धीचा

जनिता लक्ष्मीचा पति ! आठवितां चित्तीं काय नव्हे !! आणिकां उपायां कोण वांटी मन ! सुखाचें निधान पांडुरंग !! असं तुकाराम महाराज म्हणतात ते अगदी सार्थ आहे. आपल्या पदरी काहीतरी कमी असल्याची सल तिच्या मनाला लागुन होती पण ती जनात बोलून दाखवीत नव्हती. ही गोष्ट गावातील बिलंदर रंगरावानं नेमकी हेरली अन् नकळत त्याने तिला आपल्या प्रीतीच्या जाळ्यात ओढायला सुरूवात केली. तसा जाणकुशी रंगरावचा घरोबा आधीचाच बरा होता तोच त्याने अधिक वृध्दींगत केला. अडी-अडचणीला तो जाणकुच्या कामी पडु लागला.

संक्रांत-सण जवळ आला होता. एके दिवशी सकाळच्या येळेला रंगराव जाणकुच्या घराची पायरी चढत असताना जाणक्याचं बोलणे त्याच्या कानांवर पडलं. . . . .
. .

" ह्या येळेला जरा बेताचच लुगडं घेउ तुला आपण " जाणक्याचा समजावणीचा सुर !

अचूक मोका साधून रंगराव घरात शिरता शिरता. . . .

" अरं मर्दा नक्षत्रासारख्या बायकोला साडी घेताना कंजूषी कसली करतोस यार! " छद्मीपणाने म्हणाला. तसा जाणक्या लाचार नजरेने रंगरावकडे पाहू लागला. निष्णात ब्वालरने फिरकी बॉल टाकावा तसा रंगरावानं खिशातून नव्या कोऱ्या शंभराच्या पाच नोटा जाणकुच्या हातावर ठेवल्या. तसा तो अवाक होऊन नोटाकडे पहातच राहिला. क्षणभर कर्णाचा दानशूरपणा अंगी आणल्याचा आनंद रंगरावला वाटला. विजयी मुद्रेने तो सरसाकडे पहात मिष्कीलपणे गालातले गालात हसत होता अन् त्याचवेळी आपल्या

झुबकेदार मिश्यावरुन बोटं फिरवित होता. नको नको म्हणत जाणक्यानं नोटा खिशात सरकवल्या. तशी सरसा नवऱ्याकडे खवचटपणे पहात मानभावीपणे बोलली. . . .

" रुण काढून सण साजरा करण्यात कसला आला मोठेपणा, भावोजी ?"

पाणी योग्य वळणाला लागत असल्याचे पाहून खुषीत येउन रंगराव बोलला-

"असु द्या वहिनी, पाहिजे तर तुम्ही याला कर्ज समजू नका मग तर झालं!" असं म्हणत रंगरावानं सरसाकडे तिरका नयन कटाक्ष टाकून प्रणय सलामीची पहिली तोफ डागली. सरसाशी बोलण्याची एकही संधी रंगराव गमावत नव्हता. त्याचा रुबाबदार, दणकट बांधा, पीळदार मिश्यांचा डौल पाहून सरसा हवा तसा कौल देऊ लागली. तिच्या मनात घालमेल झाली. नजर सैरभैर झाली होती. जाणकुचा कडक पहारा काही टळत नव्हता अन् रंगरावच्या डोळ्यासमोरुन सरसाची छबी ढळत नव्हती.

---

शिवारभर हिरवेगार शाळूचं पीक मोठ्या दिमाखाने डुलत होतं. शेतं करडईच्या लाल पिवळ्या फुलांनी बहरुन आली होती. पुरुषभर उंचीची शाळुची पीकं वाऱ्याच्या झुळकेवर डौलदारपणे डोलत होती. रंगराव -सरसाची प्रीत गुलमोहरासारखी हळुवार फुलत होती. सरळ मार्गाने काही घावत नाही म्हणून रंगरावानं थोडी वाकडी खेळी खेळण्याचा घाट घातला होता. 'दाम देऊनही काम होत नाही ' म्हणल्यावर ' गाय देऊन बाय काढावी' ह्या तत्वाने त्याने मोठ्या हिकमतीने जाणकुच्या दारी एके दिवशी चांगली दुभती कामधेनु नेऊन बांधली. कामाच्या रगाड्यात जाणकूला सवड होत नव्हती. रंगरावानं

केलेली अटकळ रास्त ठरली. रंगरावानं मनाशी बांधलेली खूणगाठ मुर्त रुप घेउ लागली. गारुड्याच्या पुंगीच्या नादावर नागीन डुलावी तशी सरसा रंगरावच्या ईशाऱ्यावर झुलत होती. गाईला गवत आणायला म्हणून रंगरावच्या शेतात शाळूच्या पिकात शिरू लागली अन् लोकांच्या नजरेआड ' प्रणय कहाणी ' सुरू झाली.

अशाच एका रणरणत्या दुपारी ती रंगरावच्या शाळूत शिरली. गवत घेता घेता सूर्य मावळतीकडे घसरला. तापलेली ऊन्हं कोमट पाण्यासारखी गार झाली होती. वाऱ्याच्या हळुवार झुळकेवर शाळूची धाटे सळसळ आवाज करीत होती. टपून बसलेल्या रंगरावानं तिला अलगद खडा मारला तशी ती घाबरली. तिने भेदरलेल्या नजरेनं अवती भोवती पाहीलं पण कोणी दिसले नाही म्हणून पुन्हा कामात गर्क झाली. तिच्या नकळत रंगरावानं हळूच तिचा पदर ओढला. भेदरलेल्या हरणीगत तिनं मागं पाहीलं अन् दुसऱ्याच

क्षणी तिच्या डोळयातली भीती पार कुठल्या कुठे पळाली. अन् तिचे डोळे अन् ह्रदय प्रेमाने उचंबळून आलं. लटक्या रागानं ती कुरकुरली., . .

'हा काय फाजीलपणा? कुणी पाहील ना ?'

'अगं या अबोल शाळूशिवाय इथं पहायलाच काय पण तुझं हे मधुर बोलणे ऐकायलाही कोणी नाही. '

असे बोलतच त्याने धसमुसळेपणानं तिला आपल्या बाहुपाशात ओढली. तिचा रोम रोम पुलकीत झाला. अपूर्व समाधानाने सुखाने ती बेहोष झाली होती. ती कातरस्वरात पुटपुटली. . . . " हे काय ? "

" अधुऱ्या स्वप्नाची ही पुर्तता. . . . ! " असं म्हणत तिला हळुवार कुरवाळत त्या शुभ संधीकाळी त्याने प्रणयाचं माप भरभरून तिच्या पदरात टाकले. अन् नकळत तिच्या उदरात वंशाचं बिजारोपण झालं होतं. सरसाचं गात्र न् गात्र सुखावह होऊन समाधान तिच्या चेहऱ्यावरुन ओसंडून वाहु लागलं. सूर्याच्या पिवळयाधमक ऊन्हात तिची कांती सुवर्णासारखी अधिकच खुलून दिसू लागली. रंगरावानं गवताचा भारा उचलून डोईवर ठेवला. ती एका आगळयाच धुंदीत, जणू हवेत तरंगत ती घराकडे चालत होती. . . .

अन् अशा प्रकारे जाणकु पंचपत्निक होऊन संसाराचा कळस पुर्ण होऊन ही साठा उत्तराची कहाणी पांचा ऊत्तरी सुफळ, संपूर्ण झाली. . . . . . . . . . .



## --------० वा ट णी ०--------

----------------------------------------------------------

ग्रामीण सर्कल मधुन हिरापूरचे अवघे दोघेजणच प्रशासकीय सेवेत रुजू झाले, एक बाजीराव जाधवांचा महेश जिल्हा न्यायालयात, अन् दुसरा दत्तूपंत जोशांचा बाळू महसूल खात्यात तलाठी म्हणून लागले. बोर्डाच्या परिक्षेतही हेच दोघेजण गुणवत्ता यादीत

दुसऱ्या, तिसऱ्या नंबरने पास झाले होते. दोघांनाही आता नोकरी लागुन चांगले चार -पांच वर्षे झाली होती.

तशी बाजीराव आप्पांना मोठा हरीश आणि धाकटा महेश अशी दोनच मुले होती. आप्पांनी हरीशला शिकवण्यासाठी भरपूर प्रयत्न केले पण सर्व पाण्यात गेले. हरीच्या नशिबी शिकण्याचा योगच नव्हता. शिक्षणाचा त्याला अतिशय कंटाळा. त्याचा चैनबाजी अन् उनाडक्या करण्यावर भारी जोर होता. आप्पांना वडीलोपार्जित चौदा एकर शेत आणि रहायला गावात चांगला मोठा चौकाचा वाडा होता. परिस्थिती बऱ्यापैकी होती. पण हरीशवर सरस्वती नाखूषच होती. महेश मात्र पहिल्यापासून हुशार होता. न चुकता शाळेत नियमाने जायचा, मन लाऊन अभ्यास करायचा. चांगले मार्क मिळवून पास व्हायचा.

म्हणतात ना ' मुलाचे पाय पाळण्यात दिसतात' ते महेशच्या बाबतीत अगदी तंतोतंत खरं होतं. पण हरीशचं मात्र सारंच उलट होतं. विद्यार्जनात त्याला कधीच स्वारस्य वाटलं नाही. पुस्तक वाचायला घेतले की नीद्रादेवी त्याच्यावर कधी झडप घालायची हे त्याला समजायचं देखील नाही. याउलट महेश रात्र रात्र जागुन अभ्यास करायचा. सोबतच्या विद्यार्थ्याबरोबर हरीशचं कधी जमलंच नाही. काही ना काही कारणावरुन त्याचे मुलांशी नेहमी त्याचे खटके उडायचे, महेश मात्र आज्ञाधारक होता. सर्वांशी प्रेमाने, आपुलकीने वागायचा. कधी कुणाच्या रिकाम्या उचापती नाही करायचा तो.

हरीशचं मात्र सगळेच उलट होतं. सतत तो रिकामे उपद्व्याप करायचा. त्याची नसती लचांडे निस्तरता निस्तरता आप्पांना नाकीनऊ आले होते. सातवीत असताना एकदा

असाच तिडा निर्माण केला होता. तो लतीफ पठाणाच्या शमाकडे पाहून "तु है शमा, मै हू परवाना ! "हे सिनेगीत गुणगुणला अन् तेव्हढ्यावरुन मात्र शमा चांगलीच फणफणली अन् तडक तिने तणतणत मुख्याध्यापकाकडे जाऊन या प्रकरणाची तक्रार केली. मुख्याध्यापकानेही आप्पांना सत्वर शाळेत बोलावून घेतले अन् हे प्रकरण आप्पांच्या कानी घातले. आता आप्पांना हे सारं असह्य झालं आणि त्यांनी दुसऱ्याच दिवसापासून त्याची शाळा बंद केली अन् त्याला शेतावर कृषिकर्मात गुंतवला.

आप्पांच्या वयाने आता साठी पार केली होती. यथाकाळी यथाशक्ति त्यांनी दोन्ही मुलांची लग्न केली अन् दोघेही आपापल्या प्रपंचाला लागली होती. दोघांनाही मुलं बाळं झाली. हरीश घरचा कामधंदा बघायचा आणि महेश तिकडे त्याच्या नोकरीत रमला होता. तो कधीकधी गावीं येउन भेटून जायचा. त्याने नोकरीचा पैसा कधी शेतीला लावला

नाही अन् शेतीतला मालही त्याने कधी घेतला नाही. पण हरीशला माहित न करता तो आई-आप्पांना गुपचूप पैसे द्यायचा ती गोष्ट निराळी. हरीश मात्र शेती कामाला सदा नाखूषच. त्याच्याकडून कधी वेळेवर शेतीकामं, मशागत व्हायची नाही. परिणामी घराचं उत्पन्न मोठ्या प्रमाणावर घटलं होतं. घरात ताणतणाव होऊ लागला. हरीशला महेशचं नेहमी वैषम्य वाटायचं. त्याचा तो सतत हेवा, मत्सर करु लागला. दरम्यान काळात तो आप्पांशीही हूज्जत - तक्रार घालू लागला. घरातल्या कुरबुरी उंबरठ्याबाहेर जाऊ नये याची आप्पा सतत काळजी घ्यायचे. आप्पाशी तो आता फारच उद्दामपणे, बेमुर्वतपणाने वागायला लागला होता. आता तर तो आप्पा बरोबर " वाटणीची " भाषा बोलायला लागला होता. त्यांनी हे ' चहाच्या कपातील वादळ ' कधी महेशच्या कानावर जाऊ दिलं नाही. आता साऱ्याच गोष्टी आप्पांच्या आवाक्या बाहेरच्या होऊन बसल्या होत्या. ते नाईलाजाने सारे चूपचाप सहन करीत होते.

कोर्टाला ' समर हॉलीडे ' असलेने महेश सहपरिवार गांवी आला होता. दुसऱ्याच दिवशी हरीशनं ' वाटणी ' वरुन घरात गोंधळ घालायला सुरु केले. आप्पाही जवळच बसलेले होते. हरीश रगदार सुरात बोलू लागला. . . . . .

" मला आता अगदी असह्य झालं, मला माझ्या संसाराचा आणखी उपहास नाही करुन घ्यायचा, माझ्या पोराबाळांची आबाळ करुन घ्यायची नाही. मला माझी ' वाटणी ' आत्ताच पाहीजे. येगळं व्हायचं मला! "

महेशला काय बोलावं सुचेना झालं. सारे गप्पगार बसून होते. शांततेला छेद घालीत आप्पाच बोलले. . . .

" दोघं मिळून करुन टाका बाबा एकदाच्या घरादाराच्या वाटण्या म्हणजे त्याचं मन तरी शांत होईल एकदाचं ! "

आप्पांच्या या उद्गाराने हरीश मनोमन हरखुन गेला

" करुन टाका आप्पा वेगळे अन् मिटून टाका हे सारं त्रागड एकदाचं ! "

महेश जरा त्रागा करुन आप्पांच्या सुरात सुर मिळवून बोलला. त्यावर आप्पाही जरा वैतागूनच हरीशला म्हाणाले. . . .

" हरी तुच मोठा आहेस तेव्हा तुझा आधिकारही मोठाच ! तुच कर वाटण्या अन् हो वेगळा. "

अन् नंतर सारं काही हरीशच्या सांगण्या, सुचविल्याप्रमाणे ' वाटणी-सत्र ' पार पडलं. जमिनीचे तीन हिस्से ठरले. वाड्याचे मात्र दोनच वाटे झाले. हरीशनं ' आई-वडिलांची ' पण वाटणी केली. आईने हरीशकडे अन् आप्पांनी महेशकडे राहण्याचे नक्की झाले. पण हरीशने एक विचित्र अट ठेवली त्यानुसार आई-आप्पांना सहा महिन्यानंतरच एक दिवसच भेटतां येईल. तेही गांवी येऊनच भेटायचं ! अशाप्रकारे मालमत्तेचीच नव्हे तर 'आई-आप्पांची ' पण वाटणी झाली होती. सारे काही कागदोपत्री झाले अन् आता हरीशकडे आई आणि महेशकडे आप्पा राहू लागले. अन् खऱ्या अर्थाने आई-आप्पांचा वनवास सुरु झाला. आप्पांचा जगण्यातला आनंदच हरवून गेला हरीशकडे आईची आबाळ होऊ लागली. तिच्या आयुष्यातील कष्ट करण्याचे दिवस संपण्याची लक्षणंदिसेना गेली. आप्पांना दिवस कंठता

कंठेना झाला. त्यांचा स्वभाव अबोल बनला. सहा महिने पत्नी अंजनाबाईला भेटता येणार नाही या विचारानेच ते बेचैन झाले. त्यांचे मन थाऱ्यावर येईना झाले. त्यांनी बाजारातुन ' दोन नविन मोबाइल फोन हँडसेट' आणले. त्यातील एक महेशच्च्या हाती देत म्हणाले. . . .

"कसंही करुन हा तुझ्या आईकडे पोहचव म्हणजे आम्हांला निदान बोलता तरी येईल. "

दुधाची तहान ताकावर भागवण्याचा प्रयत्न ! दुसरं काय?त्यांच्या मनाची तगमग कांही केल्या कमी होत नव्हती ! तशात त्यांच्या हाती कुठून तरी थोडं संतसाहित्य

लागले अन् फावल्या वेळी ते वाचन व मनन करु लागले अन् काय जादू घडली कुणास ठाऊक? पण त्यांच्यात अमूलाग्र बदल घडून आला. त्यांच्या वैचारिक पातळीने उच्चस्तर गाठला. षडैश्वर्य संपन्न भगवंताच्या ठिकाणी त्यांचे मन रमू लागले. भगवंतावर एकदा का उच्च कोटीचं प्रेम जडलं की त्याला शिळेपणाची बाधा नसते. तिथं दुःखाची शक्यता संभवत नाही. तो आनंदरुपच आहे, शाश्वत आहे, चैतन्यरुप आहे. तो येत नाही, जात नाही, अखंड आहेच आहे. मात्र त्याच्याशी व्यावहारिक, हिशोबी प्रेम करणे उपयोगी नाही. ' आहे ते सारे देवाचे ' हेच विचार आप्पांच्या मनात घर करु लागले. भावही तोच बनला. परमार्थ जागावा लागतो, भक्ती प्रेमस्वरुप आहे. भक्तिप्रेमाच्या महासागरात झोकून दिलं की " थेंबुटा सागरी मिळाला | सागरची झाला | तत्क्षणी || ही जीवाची अवस्था होउन जाते.

एके दिवशी सकाळी आप्पा ' पारेश्वराचे दर्शनाला निघाले होते. रस्त्याने एक सामान्य माणूस पण बरोबरीने चालत होता. रस्त्याचे कडेला एक वृध्द, दुबळा, पाठपोट एक झालेला अपंग भिकारी बसला होता. भीक टाकावी म्हणून त्याने डबडे समोर केले. या माणसाच्या खिशात काहीच नव्हते पण तो पुढे निघुन गेला नाही. त्या भिकाऱ्याजवळ गेला. प्रेमाने त्याचा हात हातात घेतला म्हणाला " पुन्हा भेटलास म्हणजे देईन काहीतरी " तो भिकारी गहिंवरुन म्हणाला " महाराज, तुम्ही आज मला जे प्रेम दिले, ते अनमोल आहे जे मला पूर्वी कोणीही दिले नाही. तुच्छतेने अंगावर चार पैसे फेकणारे पुष्कळ. पण जवळ येउन हातात हात घेऊन प्रेमाने बोलणारा तुमच्यासारखा एखादाच विरळा भेटतो. तुम्ही पैसा देऊ नका, मला प्रेमच द्या ! " आप्पांनी हे सारे जवळून पाहीले. त्यांच्या डोक्यात लख्ख उजेड पडला. ते तसेच घरी आले. त्यांनी महेशला आपला मनोदय तपशीलवार सांगितला. अन् पुढे एक वर्षातच हरीशला थांगपत्ता न लागु देता महेशच्या सल्ल्याने व मदतीने आपली ईस्टेट

विकून पैसा उभा केला हिरापूर गावालगतच हिरवेगार वनश्रीने नटलेल्या 'हनुमान टेकडीच्या निसर्गरम्य ' परिसरात " अंजनी अनाथ वृध्दाश्रम " ही भव्यदिव्य वास्तू उभारली. गांवकऱ्यांनीही याच परिसरात भव्य 'हनुमान मंदिर ' ' आध्यात्मिक पाठ देणारी ' किर्तन शाळा ' 'अतिविशाल सांस्कृतिक हॉंल ' अशा कितीतरी उपयुक्त आणि उपक्रमशील वास्तू बनवून वातावरण अगदी मंगलमय बनले होते. पंचक्रोशीतील अनाथ ' वृद्ध - वृध्दा ' आश्रमात राहु लागले. आई-आप्पां ही आश्रमात राहु लागले. भक्तिरसात रमु लागले. पण " माता-पित्याची वाटणी " ही सल काही त्यांच्या मनातुन जाईना गेली. . . . . . . . .

---------० ० ०--------



## --------० इ ला ज ०--------

------------------------------------------------------

दुपारचे बरोबर बारा वाजता धनंजय पत्कीने त्याचा मित्र मोहन गुप्तेच्या बंद दारावर थाप मारून दार उघडण्याची प्रतिक्षा करु लागला. 'साप्ताहिक संघर्ष ' मधुन सनसनाटी ' कव्हर स्टोरी ' लिहीण्याच्या बाबतीत खरंतर धनंजयचा हात धरणारा कोणीही नव्हता. रहस्यमय घटनेमागचं सत्य हुडकून काढण्यात त्याचा हातखंडा होता. वणवण

भटकून, गरज पडेल तशी वाटेल ती भूमिका वठवून काळाच्या पडद्याआड दडू पाहणारं सत्य उघडकीस आणून चव्हाट्यावर मांडण्याचं निर्भीड काम त्याने पत्करले होते. खरं तर मोहन अन् तो अगदी बालपणापासूनचे 'लंगोटी-यार ' होते. दोघांचे एकमेकांवर जिवापाड प्रेम होतं. शालेय जीवनात अभ्यासाची दोघात सतत चुरस चालायची. इतकंच नाही तर परिक्षेतही दोघेही चार दोन मार्काच्या फरकाने पास व्हायचे. एकमेकांची साथ कधी दोघांनी सोडली नाही. पण पुढे दोघांच्याही आयुष्यांनी वेगवेगळी वळणे घेतली. मोहन 'पिंपळवाडी ' या आडवळणाच्या गांवी दोन वर्षापासून 'मलेरिया डॉक्टर ' म्हणून नोकरी करीत होता. धनंजयने शहरात रोखठोक बाण्याची पत्रकारीता पत्करली होती. दोघांचे मार्ग जरी भिन्नभिन्न असले तरी दोघामधला जिव्हाळा मात्र पहिल्या इतकाच कायम होता, दृढ होता. दोघांची मनं पूर्वी इतकीच एकमेकांत गुंतलेली होती. उभयता एकमेकांची मनं जपण्याचा जिवापाड प्रयत्न करायचे. एकाचं दुःख ते दुसऱ्याचं दुःख, एकाची समस्या ती दुसऱ्याची

समस्या ते आजवर मानत आले. संकटकाळी ते एकमेकांना सावरुन घ्यायचे, एक दुसऱ्याला आधार द्यायचे. आणि म्हणूनच ' सुनंदा वहिनीच्या अपघाती निधनानं ' मोहनला पहिला अन् असह्य धक्का बसला किंबहुना त्यापेक्षाही जास्त व गोंधळात टाकणारा धक्का धनंजयला बसला होता. मोहन तर हादरूनच गेला. उडणाऱ्या लाह्यासारखा फाडफाड बोलणारा मोहन दातखिळी बसल्यासारखा अबोल झाला होता. मुखदुर्बळ, मूकस्तंभ बनला होता. त्याचा स्वभाव एकलकोंडा बनू पहात होता. अन् धनंजय त्याला सावरण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होता. रहस्यमय घटणांचा वेध घेणे हा त्याचा स्थायीभाव होता. त्याच्या शंकेखोर मनात शंकेची पाल सारखी चुकचूकू लागली, यामागं नक्कीच कांहीतरी गौडबंगाल दडलेलं असावं असं सारखे त्याच्या मनाला वाटू लागले. ते रहस्य उलगडल्याशिवाय मोहनच्या मनाला बांडगूळासारखं चिकटलेले दडपण दूर व्हायचे नाही हे त्याच्या अनुभवी मनाने अचूक हेरले तसं त्याचे विचारचक्र वेगाने फिरू लागले. मोहनला दुःखाच्या या

कडेलोटातुन सावरायचे असेल तर मला पोलीसी दप्तरात " अकस्मात मृत्यू " म्हणून नोंद झालेल्या या प्रकरणाचा छडा लावलाच पाहीजे अशी खुणगाठ मनाशी पक्की मारुनच धनंजय मोहनला थांगपत्ता लागु न देता गुपचूप कामाला लागला होता. अन् आज त्याने मोहनला गांगरुन टाकणाऱ्या घडामोडींचं " सत्य हकीगतीचं गाठोडें " जमवून मनाच्या कप्प्यात दडवून आणले होते. अन् वेळ येताच मोहनला खरं गुपित सांगून तो त्याला थक्क करणार होता. विचारांच्या अथांग महासागरात त्याचं मन हिंदकळत असतानाच निर्विकार चेहऱ्यानं मोहननं दार उघडलं. समोर उभा असलेल्या धनंजयला " आंत ये " म्हणायला देखील गोंधळून गेलेल्या मोहनला सूचेना झालं. तो मूकस्तंभासारखा ऊभा होता. . .,

" अरे असे परक्यासारखे काय पाहतोस ? तुझ्या या दोस्ताला घरात नाहीस का घेणार आता? "

असं म्हणतच धनंजय घरात शिरला देखील ! मोहन दरवाजा बंद करुन माघारी वळला. त्याचा चेहरा घामाने डबडबला होता. धनंजय टेबलाजवळ असलेल्या फायबर चेअरवर बसला तसा बेचैन असलेल्या मोहनने थंड पाण्याचा ग्लास धनंजयच्या हाती दिला. दोन घोट पाणी घश्याखाली उतरवून धनंजयने मोहनचा हात धरून त्याला शेजारच्या खुर्चीवर बसवित म्हणाला. .

" मी तुला आज एका रहस्यमय घटनेमागचं सत्य सांगून आश्चर्याचा मोठा धक्काच देणार आहे बरं तुला ! "

आता आणखी नशिबी काय वाढवून ठेवले आहे अशा अविर्भावात कपाळाला हात लाऊन " सकाळीच विमा कंपनीच्या माणसाने लाखाचा धनादेश आणून दिल्याने जबरदस्त धक्का बसून मी पुरता कोलमडलोच आहेच त्यात तु आता आणखी कोणता धक्का देऊन मला पुरता जमीनदोस्त करणार आहेस " मोहन वैतागून उद्गारला.

"जमीनदोस्त नाही मित्रा, तुझा हात धरून तुला नव्या उमेदीने उभा करणार आहे. तुझ्या गोंधळून सैरभैर होउन कोंडमारा झालेल्या मनाला सत्य सांगून शांत करणार आहे. " धनंजय सांत्वनायुक्त स्वरात बोलला. त्यावर हतबल होत मोहन म्हणाला. . .

"सांग बाबा लवकर कोणते रामबाण सत्य आणून माझ्या अशांत मनाला चंदनी लेप लावुन शांत करणार आहेस कुणास माहित? "

मोहनच्या शब्दाला वैतागाची धार अन् अधीरतेची किनार होती.

" अरे मोहन तु समजतोस तसा वहिनींचा काहीं मृत्यू वगैरे झालेला नाही. वहिनी हयात आहेत!"

धनंजयच्या अनपेक्षित वक्तव्याने मोहन खूर्चीवर ताडकन् उडालाच!तो विस्मयाने धनंजयकडे पहात किंचाळलाच. . . . .

"काय, तु काय बरळतो आहेस? याचं तुला भान आहे ना?"

तसे धनंजय छातीवर हात ठेवून छातीठोकपणे म्हणाला. . .

"अरे हो बाबा मी पूर्ण शुध्दीवर आहे. "

"पण तु सांगतोस हे खरं कशावरून ? याला काही पुरावा ?" मोहननं अविश्वास दाखवित साशंकपणे प्रश्न केला. कितीतरी वेळेपासुन दाराबाहेर उभे असलेले तात्या (मोहनचे सासरे )दोघांचे बोलणे दोघांच्या नकळत ध्यान देऊन ऐकत होते. विंगेमधुन कलाकाराने रंगमंचावर प्रवेश करावा तसे तात्या घरात प्रवेश करीत दोघाजवळ येत म्हणाले. . . .

"आहे, जावईबापू तुम्ही विचारता तसा धनंजयच्या विधानाला पुरावा आहे बरे!" अन् सुनंदाने तात्यांना मैत्रीणीच्या घरुन पनवेलहून पाठविलेले पत्र तात्यांनी खिशातून काढून त्यांच्या पुढ्यात ठेवले. मोहनने आशाळभूतपणे पत्र हाती घेऊन एकटक पाहु लागला. अन् पाहता पाहता मूर्तीमंत 'सुनंदा ' त्याच्या नजरेसमोर साकार झाली. तंद्रीतुन स्वतःला कसेबसे सावरुन मोहन धनंजयला कळवळून म्हणाला. . .

"हे सारे कसे घडले सांग. मला आता धीर धरवत नाही, जीव अगदी कसा टांगणीला लागला म्हणून सांगू तुला ?"चित्रपटाचे कथानक पडद्यावर पुढे पुढे सरकावं तसं धनंजय सांगत होता. . . .

"अरे वेड्या तु कामानिमित्ताने चार दिवसासाठी वारिष्ठांसोबत बाहेर गांवी गेला होतास. दुसऱ्याच दिवशी सुनंदा वहिणींची जीवाभावाची मैत्रीण आली आणि तिने

सुनंदाला आपल्या घरी नेण्याचा खुप आग्रह धरला. वहिनींनी तुला फोन लावण्याचा खुप प्रयत्न केला पण फोन काही लागेना अन् मैत्रीण काही ऐकेना. नाईलाजाने निरोप न ठेवताच मैत्रिणीकडे गेल्या अन् नेमके त्याच दिवशी हे रामायण घडायला सुरूवात झाली. तुझ्या या धड शहर ना धड खेडे अशा 'आडगावी ' सात-आठ दुकाने ओळीने असलेल्या ' ग्रामीण पेठेत ' सुमारे वर्षभरापूर्वी मुंबई सारख्या गजबजलेल्या वस्तीत दुकान साठी जागा मिळणे मुश्कील झाले म्हणून चंपालाल शेठने " श्री बालाजी क्लाँथ स्टोअर्स " नावाने दुकान थाटले. दुकान यथातथाच चालायचे. आपला धंदा चांगला चालावा व भरघोस पैसा मिळवावा म्हणून त्याने या जाहिरातबाजीच्या युगात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला होता. दुकानात विजेच्या साहाय्याने हलचाल करणारी व बोलणारी, तारुण्याने मुसमुसलेल्या मादक सौंदर्यवान तरुणीचा हुबेहूब पुतळा ठेवला होता. उंची बनारशी शालु त्या तिल्लोत्तमेला परिधान करण्यात आला होता. सजीव स्त्रीत आणि तीमध्ये फरक असा पाहणाऱ्याला जाणवतच नव्हता. दुकानात येणारांचे हात जोडून ' नमस्कार, आपले स्वागत. तुमचा संतोष

हीच आमची ठेव!' अशा मंजुळ स्वरात स्वागत होई तसे जातांना ' प्रेम कायम असु द्या, आपल्या सेवेची पुन्हा संधी द्या ' अशा प्रेमळ शब्दांत ती सुंदरी निरोप देई. गावातल्या तरुण-तुर्कांनां तर त्या अप्सरेने जणूकाही भूरळच घातली होती. या गोष्टीचा चंपालाल शेठच्या धंद्यावर मात्र विपरीत परिणाम झाला. दुकानात गिऱ्हाईक कमी अन् बघ्यांचीच गर्दी जास्त होऊ लागली. चंपालाल या गोष्टीने जाम वैतागला. तो आता त्या निर्जीव अप्सरेवर चिडला होता. रागाच्या भरात त्याने आपल्या नोकरानां हूकुम सोडला " अंधार पडल्यावर आज रात्रीला ह्या अवदसेला अशीच्या अशी उचला अन् द्या टाकून एखाद्या जुनाट विहिरीत. " म्हणून चंपालालच्या गड्यांनी त्या सुंदरीला तशीच उचलली अन् यादुनानांच्या शेताच्या दिशेने निघाले. विहिरीच्या जवळ आले अन् इतक्यात त्यांना अंधारात दोन, तीन माणसांच्या अंधुक आकृत्या दिसू लागल्या, कुजबुजण्याचा अस्पष्ट आवाज कानी आला तसे ते धांदरट गडी पुतळा तसाच टाकून ढुंगणाला पाय लावुन अंधारात पळून गेले. अन् गुपचूप

आपापल्या घरात गुडूप झाले. विहिरीजवळच्या अज्ञात लोकांनी आणलेल्या स्त्रीप्रेताला शालु नेसवून प्रेत व पुतळा त्या निबीड अंधारात, जुनाट ओसाड विहिरीतल्या पाण्यात एकाच वेळी टाकून विल्हेवाट लावाली. त्या निरव शांततेत पाण्याचा भयंकर आवाज असमंतात भयानकपणे घुमला. विहिरीचं उसळणारं पाणी शांत झालं अन् रात्रीच्या त्या भेसूर अंधारात एका ' भीषण नाट्याचा ' लोप झाला.

दुसऱ्याच दिवशी " वहिनीचं अपघाती निधन " या शोकनाट्याला सुरुवात झाली. पोलीसांनी विहिरीतुन वर काढलेल्या त्या अनोळखी स्त्री जातीच्या प्रेताच्या हातावर, चेहऱ्यावर जलचरांनी कुरतडल्याने चेहरा मुळीच ओळखायला येईना झाला. प्रेताच्या अंगावरील " बनारशी शालु " पाहून जमलेल्या लोकांनी ती सुनंदा वहिनीच आसल्याचे

एकमुखाने, एक आवाजात अन् एकदिलाने पोलीसांना सांगितले. अन् तीच तुझी शोकांतिका ठरली. मोहन डोळे विस्फारुन, तोंडाचा चंबु करून विस्मित नजरेने धनंजयकडे पहात सर्वांगाचे कान करुन ऐकत होता. बटन दाबताच विद्युत बल्ब लागावा तद्वत मोहनला तीन महिन्याच्या पूर्वी श्री बालाजी क्लॉथ स्टोअरमधुन संक्रातीला सुनंदाला घेऊन दिलेल्या शालुची एकदम आठवण झाली. गेल्या महिनाभरापासून टांगणीला लागलेला मोहनचा जीव एकदाचा भांड्यात पडला. तंद्रीतुन जागा होत मोहन साश्रु नयनांनी तात्याकडे पहात सद्‌दीत कंठाने म्हणाला. . .

"तात्या, तुम्ही पण माझ्यापासुन हे लपवून ठेवून माझा मानसिक छळ केलातच ना?"

तसे तात्या अश्रूंनी डबडबलेले डोळे धोतराच्या सोग्याने पुशीत बोलु लागले.

"हो, जावईबापू मला माफ करा. माणसाला राक्षस बनविणाऱ्या ' जीव घेण्या हुंडा प्रथेचं' सगळीकडे भीषण तांडव चालू असणाऱ्या काळातही हुंडा प्रथेला फाटा देऊन एक पै न घेता तुम्ही माझ्या सुनंदाचा स्विकार केला. तुमचे उपकार मला शब्दात नाही सांगता येणार ! त्याचवेळी 'अथांग सागरासारखं विशाल अंतःकरणाचा ' माणुस म्हणून तुमचे प्रत्यंतर मला आले. थोडे का होइना ऊतराई होण्याची संधी चालुन आली. लग्नाआधीच मी सुनंदाचा विमा काढला होता त्याचाच हा धनादेश. आपण त्याचा निसंकोचपणे स्विकार करावा, "

सर्व उलगडा झाला तसं मोहनचे मन फुलासारखे हलके झाले पण दुसऱ्याच क्षणी त्याचा चेहरा काळवंडला. तो चिंताग्रस्त होत्सता म्हणाला. . .

"झाले ते ठिक झाले पण सुनंदा जीवंत असल्याचा हर्ष मानावा की आता तिचा पत्नी म्हणून स्विकार करता येत नाही याचं दुःख करावं? हेच समजेना झालं. का असेच जन्मभर विधुर म्हणून जीवन कंठावे लागणार ? यावर काही ईलाज आहे का?" त्याने अगतिक होत धनंजयला विचारलं. त्यावर धनंजय धीर देत गंभीरपणे म्हणाला. . .

" आहे, यावरही ईलाज आहे. पण मला मात्र या ईलाजाकरीता एका सनसनाटी ' कव्हर स्टोरीला ' मुकावे लागणार आहे. पण तुझ्यासाठी मला एव्हढा त्याग करायला आवडेल. आता ह्या गोष्टीची वाच्यता न करता सुनंदा वहिणीचं नाव बदलून

'लग्नपत्रिका' छापुन तात्यांची 'द्वितीय कन्या ' म्हणून वहिनीशी पुन्ह्यांदा ठणकावून विवाह करायचास, हाच यावर रामबाण ईलाज आहे!"

असं म्हणत धनंजय छद्मीपणाने हासत होता अन् मोहनच्या कानांत मात्र पाहता पाहता सनई चौघड्याचे मंगल सुर घुमू लागले. . . . . . . . . . . . . . . . . . .

-----0----- -----0------ -------0--------



# ई साहित्य प्रतिष्ठान

वाचन हा एक चांगला टाईमपास आहे. त्यात छान वेळ जातो. पण वाचन हा केवळ टाईमपास नाही. आणि “वेळ” हा “घालवण्या”साठी नाही. आपण वाचत असतो तेव्हा आपण घडतही असतो. पुस्तकांतले शब्द आपले छिन्नी हतोड्याचे काम चोख बजावत असतात. मनावर संस्कार होत असतात. त्यामुळे वाचन करणारा समाज आणि निव्वळ पोटार्थी समाज यांच्यात फ़रक असतो. दिसतो. जाणवतो.

त्यातून शब्द जर मातृभाषेतून असतील तर त्या छिन्नीला धार येते. हातोडी जोमदार होते. मनावर होणारे परिणाम आणि संस्कार अधिकच गडद असतात. म्हणून मराठीत वाचन संस्कृती रुजवायची आहे. वाचनाची आवड जोपासायची आहे. वाचनाची वृत्ती,

वाचनाचा छंद फ़ुलवायचा आहे. एकट्यादुकट्या व्यक्तीत नाही. मराठीच्या कोट्यवधी साक्षरांत मराठी वाचनाची गोडी निर्माण करणं आणि त्याचं छंदात रुपांतर करणं हे आमचं ध्येय आहे. आणि त्यासाठी माध्यम आहे इंटरनेट.

एक गोष्ट सत्य आहे. अगदी रुस्तमातला रुस्तम वाचक आपलं पहिलं पुस्तक विकत घेत नाही. कधी भेट म्हणून, कधी घरात पडलेलं. कधी शेजारून. कधी वाचनालयातून. त्याच्या हातात विनामूल्य पुस्तक पडतं आणि तो वाचतो/वाचते. मग जसजशी गोडी लागत जाईल तसतसं किंमतीची पर्वा न करता पुस्तक मिळवून वाचायला लागतो. पण ही गोडी पेरावी लागते. म्हणून आम्ही विनामूल्य पुस्तकं दर आठवड्याला निर्माण करून पाठवत असतो. या अभियानात आम्हाला लेखकांचं खुप पाठबळ आहे. अनेक चांगले चांगले लेखक आपली उत्तम दर्जाची पुस्तकं आम्हाला विनामूल्य उपलब्ध करून देतात. म्हणून तर आम्ही आपल्याला उत्कृष्ट पुस्तकं विनामूल्य देऊ शकतो. विनामूल्य आहे म्हणून काहीतरी साधंसुधं

देत नाही. बाजारात पैसे देऊनही मिळणार नाहीत अशी उत्कृष्ट दर्जेदार भारी पुस्तकं आम्ही विनामूल्य देऊ शकतो ती केवळ आमच्या लेखकांच्या कृपेने.

ई साहित्य प्रतिष्ठान हे व्यासपीठ नवीन मराठी साहित्यिकांसाठी आणि वाचकांसाठी ई पुस्तकांचे दालन घेऊन उभे ठाकले आहे. लाखो वाचकांपर्यंत ही पुस्तके विनामूल्य वितरीत करायला सुरूवात केली आहे. इंटरनेटवर मराठी भाषेतील साहित्य लोकप्रिय करण्याची चळवळ हिरिरीने पुढे नेली. कविता, कथा कादंबऱ्या आणि गंभीर विषयांवरची पुस्तके प्रकाशित केली. दोन लाख रसिकांपर्यंत हे दर्जेदार साहित्य विनामूल्य पोचवले. विनामूल्य. हे एक भव्य काम सुरू आहे. नव्या प्रतिभा, नवे लेखक, नवीन निर्मिती. मराठीत एक नवा अध्याय लिहिला जात आहे. ही नुसती सुरुवात आहे. लेखकांचं पाठबळ जर असंच मिळत राहिलं तर फ़ार मोठी झेप घ्यायची मनिषा आहे.

ई साहित्य प्रतिष्ठानच्या वेबपेजवर सातत्याने नवनवीन भर पडत असते. आपण पहाता ना? नवीन सुमारे तीस पुस्तकं लवकरच येत आहेत. सगळीच तुम्हाला हवी असतील तर संपर्कात रहा. VIP सभासद बना.

VIP सभासद बनणं अगदी सोप्पं आहे. आपल्या ओळखीच्या दहा लोकांचे मेल आय डी कळवा आणि बना VIP सभासद.

एका दमात तीन कामं. पहिलं म्हणजे तुम्ही VIP सभासद बनता. ज्या दहा लोकांना तुमच्यामुळे फ़्री पुस्तकं मिळतात ते खुश होतात. आणि यातून तुम्ही मराठी भाषेच्या संवर्धनाला अमूल्य असा हातभार लावता. आहे ना : एक दम : तीन कामं.

संपर्क साधा : esahity@gmail.com

ही सेवा पूर्णपणे निःशुल्क आहे. त्यामुळे आपले मित्र आपल्यावर खुश होतील. शिवाय आम्ही ही खात्री देतो की या ई मेल्सचा वापर फ़क्त आणि फ़क्त मराठी साहित्य पाठवण्यासाठीच केला जाईल. इतर कसल्याही जाहिराती पाठवून त्यांना त्रास दिला जाणार नाही. तेव्हा लवकरात लवकर आपल्या माहितीतल्या दहा किंवा अधिक मराठी साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला द्या.

आपल्या पत्राची वाट पहात आहोत.

धन्यवाद

आपले नम्र
टीम ई साहित्य प्रतिष्ठान

